सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील महामंडळांमार्फत राबविण्यात येणा-या विविध कर्ज योजनांसाठी लाभार्थ्यांची उत्पन्न मर्यादा रु. १ लक्ष वरुन रु. ३ लक्ष पर्यंत वाढविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.०१/महामंडळे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ फेब्रुवारी,२०१९.

वाचा :-

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.- संकीर्ण-२०११/प्र.क्र.४९/महामंडळे, दि. १६/०३/२०१२,
२. राष्ट्रीय अनुसुचित जाती मागासवर्ग वित्तीय विकास महामंडळ, नवी दिल्ली यांचे दि.२३/०४/२०१८ चे परिपत्रक.

प्रस्तावना :-

शासन निर्णय, दि.१६/०३/२०१२ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या खालील महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनांसाठी लाभार्थ्याची उत्पन्न मर्यादा रु.१ लक्ष इतकी विहित करण्यात आली आहे:-

१. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., मुंबई,
२. संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या., मुंबई,
३. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या., मुंबई,
४. महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या., मुंबई.

२. सदर महामंडळांमार्फत अनुसूचित जाती व अपंग प्रवर्गातील घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी तसेच त्यांना स्वयंरोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. सदर महामंडळे राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (National Scheduled Castes Finance and Development Corporation (NSFDC)), नवी दिल्ली, राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (National Safai Karamchari Finance & Development Corporation (NSKFDC)), नवी दिल्ली व राष्ट्रीय विकलांग वित्त एवम् विकास निगम (National Handicapped Finance and Development Corporation (NHFDC)), नवी दिल्ली यांची अधिकृत वाहिनी म्हणून कार्यरत असून राज्यात या राष्ट्रीय महामंडळांच्या विविध योजनांसाठी सदर महामंडळांना राष्ट्रीय महामंडळांकडून कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध करून दिला जातो. महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी रु.१ लक्ष या कमी उत्पन्न मर्यादेमुळे महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेऊ इच्छीणाऱ्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेता येत नाही.

३. राष्ट्रीय अनुसुचित जाती मागासवर्ग वित्तीय विकास महामंडळ (NSFDC), नवी दिल्ली यांनी दि.२३/०४/२०१८ च्या परिपत्रकान्वये लाभार्थ्यांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ३ लक्ष इतकी विहित केली आहे. ही बाब विचारात घेऊन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातंर्गत कार्यरत असलेल्या महामंडळांच्या विविध कर्ज योजनांचा लाभ जास्तीत जास्त गरजू व्यक्तींना उपलब्ध करून देण्यासाठी तसेच कर्ज योजनांची व्याप्ती वाढविण्यासाठी लाभार्थ्यांची उत्पन्न मर्यादा वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातंर्गत कार्यरत असलेल्या महामंडळांच्या विविध कर्ज योजनांचा लाभ गरजू व्यक्तींना उपलब्ध करून देण्याकरीता लाभार्थ्यांसाठी आवश्यक असलेली वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.१ लक्ष वरुन रु. ३ लक्ष (लाभार्थ्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न) इतकी करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. तथापि, Special Central Assistance (SCA) अंतर्गत Subsidy द्यावयाची असल्यास (सध्या रु. १०००० प्रती लाभार्थी) त्या लाभार्थ्यांची उत्पन्न मर्यादा केंद्राच्या निकषाप्रमाणे राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०१९०२२५१७३१०७९८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil D Sardar

Digitally signed by Sunil D Sardar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0098eb68042c66b72115bc62ef9206ece42981aab126657128d7cadca447533, cn=Sunil D Sardar
Date: 2019.02.25 17:33:20 +05'30'

(सुनिल सरदार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. आयुक्त, अपंग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., मुंबई ,
४. व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या., मुंबई,
५. व्यवस्थापकीय संचालक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ मर्या.,मुंबई,
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या., मुंबई.

प्रत :-

१. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधान परिषद सदस्य,
३. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री, (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

६. मा.राज्यमंत्री, (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव, (सा.न्या.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
९. उप सचिव / अवर सचिव (महामंडळे), (सा.न्या.), मंत्रालय, मुंबई,
१०.सह सचिव, (अर्थसकंल्प) (सा.न्या.), मंत्रालय, मुंबई,
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.सर्व जिल्हाधिकारी,
१३.सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१६.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१७.सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई,
१८.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
२१.निवडनस्ती (महामंडळे).